## तिस्ता सेटलवाड यांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी

**पीटीआय, नवी दिल्ली**

**गुजरात उच्च** न्यायालयाने सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांच्या जामीन अर्जावर राज्य सरकारला नोटीस पाठवून सहा आठवड्यांनंतर हा अर्ज १९ सप्टेंबर रोजी सुनावणीसाठी सूचिबद्ध का केला, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी विचारला. शुक्रवारी दुपारी दोन वाजेपर्यंत याचे उत्तर देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

सरन्यायाधीश उदय उमेश लळित, न्यायमूर्ती एस. रवींद्र भट आणि सुधांशू धुलिया यांच्या खंडपीठाने सेटलवाड यांची याचिका शुक्रवारी पुढील सुनावणीसाठी ठेवली. २००२च्या गुजरात दंगली प्रकरणांमध्ये बनावट पुरावे तयार करण्याचा आरोप सेटलवाड यांच्यावर असून या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली आहे. ''शुक्रवारी दुपारी दोन वाजता या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. अशा प्रकरणांतील आरोपी महिलेला उच्च न्यायालयाकडून तारखा मिळाल्याचे उदाहरण द्या, न्यायालय अशा प्रकारची तारीख कशी देऊ शकते, गुजरातमध्ये ही प्रमाणित प्रथा आहे का,'' असे प्रश्न विचारत सर्वोच्च न्यायालयाने उघडपणे नाराजी व्यक्त केली. तिस्ता सेटलवाड यांना जामीन नाकारण्याचे कोणतेही ठोस कारण नसून त्यांच्या जामीन अर्जावर सहा आठवड्यानंतर सुनावणी कशी ठेवली जाऊ शकते, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला.

# ‘मतदार यादी’वरून काँग्रेसमध्ये वादंग

## सदस्य नोंदणी ऑनलाइन जाहीर करण्याच्या मागणीवरून मतभेद तीव्र; ‘यादी जाहीर करण्याची गरज काय?’

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या पक्षाध्यक्ष पदाच्या निवडणुकीची तयारी सुरू झाली असून ‘मतदार यादी’ म्हणजेच सदस्य नोंदणीची नवी यादी ऑनलाइन जाहीर करण्यावरून पक्षांतर्गत मतभेद तीव्र झाले आहेत. ‘ज्यांना ही यादी पाहायची असेल, त्यांनी काँग्रेसच्या मुख्यालयात जाऊन प्रत्यक्ष बघावी. ही यादी जाहीर करण्याची गरजच काय,’ असा सवाल काँग्रेसचे नेते प्रताप बाजवा यांनी केला आहे.

काँग्रेसचे संघटना महासचिव के. वेणुगोपाल आणि पक्षाच्या निवडणूक विभागाचे प्रमुख मधुसूदन मिस्त्री या दोघांनीही ‘मतदार यादी’ जाहीर केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. काँग्रेसने सदस्य नोंदणी मोहीम राबवली होती, त्यातून नवे सदस्य पक्षाशी जोडले गेल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र नवी यादी जाहीर केल्याशिवाय या दाव्यावर विश्वास कसा ठेवणार? पक्षाध्यक्षपदाची निवडणूक निर्दोष व्हावी असे वाटत असेल तर, काँग्रेसने ही यादी जाहीर केली पाहिजे, अशी मागणी बंडखोर गटातील नेते मनीष तिवारी, शशी थरूर, कार्ती चिदम्बरम, आनंद शर्मा आदींनी केली आहे.

पक्षाध्यक्षपदासाठी १७ ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून राहुल गांधी पक्षाध्यक्ष पद स्वीकारण्यास तयार नसतील, तर गांधी निष्ठावान उमेदवाराला बंडखोर गटाकडून आव्हान दिले जाऊ शकते. त्यामुळे पक्षाध्यक्ष पदाच्या निवडणुकीवरून वादंग माजला आहे. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, सुमारे ९०० पात्र सदस्य मतदान करू शकतील. काँग्रेसचे नेते प्रताप बाजवा यांच्या म्हणण्यानुसार, ही पक्षांतर्गत निवडणूक असून त्यासाठी यादी जगजाहीर करण्याची आवश्यकता नसते. ज्या व्यक्ती तशी मागणी करत आहेत, त्यांच्यापैकी कोणीही निवडणुकीच्या रिंगणात उतरणार नाहीत. तरीही त्यांच्याकडून विनाकारण मागणी केली जात आहे. ज्या फांदीवर बसलो, त्यावर कुऱ्हाड चालवण्याचा हा प्रकार असल्याची टीकाही बाजवा यांनी केली.

### पृथ्वीराज चव्हाणांवर कारवाईची मागणी

काँग्रेसला सोडचिठ्ठी देणारे गुलाम नबी आझाद यांच्या राजीनाम्यानंतर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केल्याचा दावा करत त्यांच्यावर कारवाई करण्याची विनंती काँग्रेसच्या विदेश विभागाचे सचिव विरेंद्र वशिष्ट यांनी केली आहे. ही विनंती करणारे पत्र पक्षाच्या शिस्तपालन समितीचे प्रमुख तारिक अन्वर यांच्याकडे पाठवले आहे. बंडखोर ‘जी-२३’ गटातील सदस्य असलेल्या भूपेंदर हुडा व आनंद शर्मा यांच्यासह पृथ्वीराज चव्हाण यांनी दोन दिवसांपूर्वी दिल्लीत आझाद यांची भेट घेतली होती.

### दिल्ली, जम्मूतील सभांकडे लक्ष

दिल्लीत रामलीला मैदानावर रविवारी काँग्रेसची जंगी सभा होणार असून त्यामध्ये राहुल गांधी कार्यकर्त्यांसमोर भाषण करणार आहेत. ही सभा महागाईविरोधात निदर्शने करण्यासाठी आयोजित केली असली तरी, पक्षांतर्गत घडामोडींचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. कारण, त्याच दिवशी आझाद जम्मूमध्ये जाहीर सभा घेणार असून कदाचित नव्या पक्षाची घोषणाही केली जाऊ शकेल, असे मानले जात आहे. गुलाम नबी आझाद यांच्या राजीनाम्यानंतर काँग्रेसची ही पहिलीच जाहीर सभा असेल.

# गुजरात विधानसभेची लढाई दिल्लीच्या विधानसभेत

## केजरीवाल सरकारने विश्वासदर्शक ठराव जिंकला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** गुजरात विधानसभा निवडणुकीची लढाई गुरुवारी दिल्ली विधानसभेत लढली गेली. दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यावर ‘सीबीआय’ने केलेल्या कारवाईचा आम आदमी पक्षाला राजकीय लाभ झाला असून गुजरातमध्ये ‘आप’च्या मतांमध्ये दोन टक्क्यांची वाढ झाल्याचा दावा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभेत केला.

गुजरातमध्ये वर्षअखेरीला विधानसभेची निवडणूक होणार असून भाजपच्या बालेकिल्ल्यात ‘आप’ने प्रचाराला वेग दिल्यानंतर भाजप आणि आप यांच्यामध्ये राजकीय संघर्षही तीव्र झाला आहे. ‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःच्या हाताने २ टक्के मते आमच्या झोळीत टाकली आहेत’, असा दावा केजरीवाल यांनी केला.

भाजपने ‘आप’च्या आमदारांना पक्षातून फोडण्याचा प्रयत्न केला असून महाराष्ट्राप्रमाणे दिल्लीतही कमळ मोहीम राबवण्याचा घाट घातल्याचा आरोप ‘आप’कडून केला गेला. भाजपचे फोडाफोडीचे राजकारण फोल ठरल्याचे सिद्ध करण्यासाठी दिल्लीतील सत्ताधारी ‘आप’ सरकारने विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मांडला व तो गुरुवारी संमत करून घेतला. एकही आमदार फोडण्यात भाजपला यश आले नसल्याचा दावा केजरीवाल यांनी केला. विश्वासदर्शक ठरावाच्या उत्तरामध्ये केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदींना अप्रत्यक्ष आव्हान दिले.

‘सिसोदियांवर कारवाई केल्यापासून ‘आप’च्या मतांमध्ये ४ टक्के वाढ झाली असून सिसोदियांना अटक होईल, तेव्हा आणखी दोन टक्के मते तरी वाढतील. समजा सिसोदियांना दोनदा अटक झाली तर, कदाचित गुजरातमध्ये ‘आप’चे सरकार स्थापन होईल’, असे केजरीवाल विधानसभेत म्हणाले.

दिल्लीतील उत्पादन शुल्क धोरणात बदल केल्यामुळे राज्य सरकारचे आर्थिक नुकासन झाले आहे. मद्यधोरणातील बदलामध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा दावा करण्यात आला असून ‘सीबीआय’ने यासंदर्भात सिसोदियांच्या निवासस्थानी छापेही टाकले होते. त्यानंतर दिल्लीमध्ये आप विरुद्ध भाजप अशी लढाई रंगली आहे. दिल्लीचे नवे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी ‘सीबीआय’ चौकशीचा आदेश दिल्यामुळे ‘आप’ने त्यांच्याविरोधातही मोहीम सुरू केली असून त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. त्यामुळे सक्सेना यांनी ‘आप’विरोधात कायदेशीर लढाई लढण्याचा इशारा दिला आहे. दिल्लीतील या सर्व मुद्द्यांवर केजरीवाल गुजरातमधील प्रचारसभांमध्ये बोलत आहेत. भाजप दिल्लीमध्ये ‘आप’वर अन्याय करत असल्याचा आरोप केजरीवाल गुजरातमध्ये करत असून मतदारांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळेच दिल्ली विधानसभेत बोलताना केजरीवाल यांनी पंतप्रधानांनी गुजरातमधील मते ‘आप’च्या झोळीत टाकल्याचे विधान केल्याचे सांगितले जात आहे.

दिल्ली विधानसभेत ७० सदस्य असून आपकडे ६२ संख्याबळ आहे. विश्वासदर्शक ठरावावेळी आपच्या ५८ आमदारांनी ठरावा पाठिंबा दिला, २ सदस्य परदेशात असून सत्येंद्र जैन तुरुंगात आहेत. गोंधळ घातल्याबद्दल भाजपच्या सदस्यांना निलंबित करण्यात आले.

# सामाजिक कार्यकर्त्या मेरी रॉय यांचे निधन

**पीटीआय, कोट्यम (केरळ)**

**प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ** आणि सामाजिक कार्यकर्त्या मेरी रॉय (वय ८९) यांचे गुरुवारी सकाळी सव्वानऊ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. रॉय यांच्या कायदेशीर लढाईमुळे सीरियन ख्रिश्चन महिलांना वडिलोपार्जित संपत्तीत समान अधिकार मिळाला. त्या प्रसिद्ध लेखिका आणि बुकर पुरस्कार विजेत्या अरुंधती रॉय यांच्या आई असून पल्लीकूदम शाळेच्या संस्थापक आहेत.



अंतिम दर्शनासाठी रॉय यांचे पार्थिव गुरुवारी दुपारी दोन ते रात्री नऊ वाजतादरम्यान पल्लीकूदम शाळेच्या आवारात ठेवण्यात आले होते, तर शुक्रवारी, २ सप्टेंबरला सकाळी सात ते दुपारी दोनदरम्यान एमआर ब्लॉक येथे त्यांचे पार्थिव ठेवण्यात येणार आहे. दुपारी दोननंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

रॉय यांनी १९८० च्या दशकात केरळमधील सीरियन ख्रिश्चन परिवारातील वडिलोपार्जित मालमत्तेत महिलांना समान अधिकार देण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात लढा सुरू केला होता. उच्च न्यायालयाने १९८६ मध्ये एक ऐतिहासिक निर्णय देत त्यांची याचिका मंजूर केली होती. त्यानंतर त्रावणकोर राज्याचा १९१६ चा त्रावणकोर उत्तराधिकारी कायद्यातील तरतुदी बदलून सर्वोच्च न्यायालयाने सीरियन ख्रिश्चन परिवारातील महिलांना त्यांच्या पित्याच्या संपत्तीत समान अधिकार आहे, असा निर्णय दिला. हे प्रकरण भारतीय कायद्याच्या इतिहासात ‘मेरी रॉय केस’ म्हणून ओळखण्यात येते. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी रॉय यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले.


**हिंदुस्थान युनिलिवर लिमिटेडचे**
**समभाग हरवल्याची सूचना**
(पूर्वीचे हिंदुस्थान लिवर लिमिटेड (एचयूएल))
नोंद. कार्यालय : हिंदुस्थान युनिलिवर लिमिटेड, युनिलिवर हाऊस, बी. डी. सावंत मार्ग, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९९.

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, खालील भाग प्रमाणपत्र हरवले/ गहाळ झाल्याचे कळविण्यात आले आहे आणि कंपनी त्याच्या बदल्यात योग्य कालावधीमध्ये प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र जारी करण्याचा विचार करत आहे. कोणीही व्यक्ती ज्याचा नमूद भागांवर वैध दावा आहे त्यांनी त्यांचे दावे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर १५ दिवसांच्या कालावधीमध्ये करावेत.

| धारकाचे नाव | फोलियो क्र. | भागांची संख्या (रु. १०/- द.मू.) | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. |
|---|---|---|---|---|
| सरिता कोहली (सरिता विजय कोहली) | एचएलएल२९१७९५१ | ४० | २२२२६९५ | १८३३६३६३८-१८३३६३६७७ |

दिनांक :
देव बाजपेयी
कंपनी सचिव



Trejhara

## ट्रेजहरा सोल्युशन्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** युनिट क्र. ६०१, सिम्मा आयटी पार्क, प्लॉट क्र. आर-२०३, आर-२०४, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल इस्टेट, रबाळे, नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०१. **CIN:** L72900MH2017PLC292340, **दूरध्वनी क्र.** +९१-२२-४०४०-८०८०, **फॅक्स:** +९१-२२-४०४०-८०८१, **ईमेल:** investor@trejhara.com, **संकेतस्थळ:** www.trejhara.com

**वार्षिक सर्वसाधारण सभा, बुक क्लोजर आणि ई-व्होटींगची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, **ट्रेजहरा सोल्युशन्स लिमिटेडची** ५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम''), सदर सभेचे आमंत्रण देणाऱ्या सुचनेमध्ये नमुद कामकाज निष्पादनासाठी होईल. **सोमवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी दु. १२:०० वा. (भाप्रवे), व्हीडीयो कॉन्फरन्सींग (''व्हीसी'') किंवा अन्य व्हीडीयो व्हीज्युअल साधनांद्वारे (''ओएव्हीएम'') होईल.**

कोव्हीड-१९ महामारीच्या उपद्रवामुळे, देशामधील विविध ठिकाणी व्यक्तिंच्या हालचालीवरील निर्बंध असल्याच्या दृष्टीकोनातून, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे (''एमसीए'') त्यांच्या ०८ एप्रिल, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. १४/२०२० सहवाचित ०५ मे, २०२२ दिनांकित परित्रक क्र. २/२०२२, ०८ डिसेंबर, २०२१ दिनांकित १९/२०२१, १४ डिसेंबर, २०२१ दिनांकित २१/२०२१, १३ जानेवारी, २०२१ दिनांकित ०२/२०२१, ०५ मे, २०२० दिनांकित २०/२०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. १७/२०२० (एकत्रीतरित्या ''एमसीए परिपत्रक'') आणि भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळाद्वारे (''सेबी'') द्वारे वितरीत अन्य प्रयोज्य अन्य परिपत्रकाच्या अनुरोधाने, कंपन्यांना या वर्ष दरम्यान सामाईक स्थळावर सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती विना व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएम आयोजनाची परवानगी दिली आहे. एमसीएस परिपत्रक, सेबी परिपत्रकांच्या अनुसार, कंपनीची एजीएम व्हीसी/ओएव्हीएमद्वारे आयोजीत करण्यात येईल.

उपरोक्त सदर एमसीए आणि सेबी परिपत्रकांच्या अनुरूपतेमध्ये, वित्तीय वर्ष २०२१-२२ करता कंपनीच्या वार्षिक अहवालासोबत एजीएमची सूचना, ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते त्यांच्या डीपॉजीटरी पार्टीसीपंटस/कंपनीकडे नोंदविले आहेत त्या सभासदांना गुरूवार, दिनांक ०१ सप्टेंबर, २०२२ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून (ई-मेल) पाठविण्यात आले आहेत.

वित्तीय वर्ष २०२१-२२ करता वार्षिक अहवालासोबत एजीएमची सूचना कंपनीच्या संकेतस्थळ www.trejhara.com स्टॉक एक्सेंजेसची संकेतस्थळ अर्थात बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळांवर आणि एनएसडीएलचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.

कंपनीद्वारे देण्यात आलेल्या व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सभासद एजीएमला उपस्थित राहू शकतील. एजीएममध्ये उपस्थित राहण्याचे निर्देश एजीएम सूचनेमध्ये देण्यात आले आहेत.

कंपन्यांचा (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारित अधिनियम, २०१५ द्वारे सुधारित अनुसार, कंपन्यांचा (व्यवस्थापन आणि प्रशासन) अधिनियम, २०१४ च्या नियम २० सहवाचित, कंपन्यांचा कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ९१ आणि १०८ आणि सेबी (सुचिबध्दता बंधन आणि प्रकटन आवश्यकता विनियम) विनियम, २०१५, आणि त्या अतिरिक्त उपरोक्त नमूद परिपत्रकांच्या अनुरोधाने अशीही सूचना देण्यात येते की कंपनीच्या सभासदांचे रजिस्टर आणि कंपनीचे शेअर हस्तांतरण पुस्तक, एजीएम आणि लाभांश वाटपासाठी मंगळवार, २० सप्टेंबर, २०२२ ते मंगळवार, २७ सप्टेंबर, २०२२ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील.

कंपनी आपल्या सभासदांना एजीएममध्ये पारित होणाऱ्या प्रस्तावित ठरावांवर त्यांचा मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सुविधा पुरविणार आहे. सभासद त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे सभेच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त अन्य स्थळावरून (रिमोट ई-व्होटींग) किंवा एजीएम दरम्यान करू शकतील. ई-व्होटींग सेवा देण्यासाठी कंपनीने एनएसडीएल सोबत करार केला आहे. रिमोट ई-व्होटींग कालावधी शुक्रवार, २३ सप्टेंबर, २०२२ रोजी स. ९:०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, २५ सप्टेंबर, २०२२ रोजी सायं. ५:०० वा. (भाप्रवे) समाप्त होईल. रविवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी सायं. ५:०० वा. नंतर रिमोट ई-व्होटींग मॉड्यूल निष्क्रीय करण्यात येईल. सभासदांने रिमोट व्होटींग सुविधेद्वारे ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर, त्या सभासदाला ते बदलता येणार नाही. मतदानाचा अधिकार सोमवार, १९ सप्टेंबर, २०२२ (कट-ऑफ दिनांक) रोजी सभासदांनी धारण केलेल्या समभागांच्या संख्येनुसार असेल. केवळ कट-ऑफ तारखेला शेअर्स धारण केले असल्यास रिमोट ई-व्होटींगद्वारे किंवा एजीएमच्या दरम्यान मतदान करण्यासाठी सभासद पात्र आहेत. ज्या सभासदांनी वार्षिक अहवाल पाठविल्यानंतर शेअर्स संपादित केले आहेत आणि कट-ऑफ दिनांक अर्थात सोमवार, १९ सप्टेंबर, २०२२ रोजी शेअर्स धारण केले आहेत, ते एजीएम सूचनेमध्ये नमूद निर्देशांचे अनुसरण करून रिमोट ई-व्होटींग आणि एजीएममध्ये व्होटींग सुविधेसाठी पात्र होतील आणि लॉगइन आयडी व पासवर्ड प्राप्त होईल. ई-व्होटींगची सुविधा एजीएममध्येही उपलब्ध करण्यात येईल आणि ज्यांनी रिमोट ई-व्होटींगद्वारे मतदान केले नाही असे एजीएमला उपस्थित राहणारे एजीएम दरम्यान मतदानासाठी पात्र असतील. ज्या सभासदांनी त्यांचे मतदान रिमोट ई-व्होटींगद्वारे केले आहेत ते रिमोट ई-व्होटींगद्वारे मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतू त्यांना एजीएममध्ये पुन्हा मतदान करण्याची अनुमती नसेल.

डीमॅट आणि भौतिक प्रारूपामध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांद्वारे रिमोट ई-व्होटींग आणि एजीएममध्ये ई-व्होटींग आणि ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणी केले नाहीत त्यांच्यासाठी पध्दत आणि ई-व्होटींगसाठी लॉगइन आयडी आणि पासवर्ड संबंधीत माहिती, निर्देश आणि प्रक्रिया, एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

ई-व्होटींग विषयक काही विचारणा/तक्रारी असल्यास, तुम्ही एजीएमची सूचना किंवा https://www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शनमध्ये उपलब्ध असलेल्या सभासदांसाठी फिक्वेंटली आस्क क्वेश्चन (एफएक्यूज) पाहू शकता किंवा टोल मुक्त क्रमांक १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० वर संपर्क करा किंवा सुश्री पल्लवी म्हात्रे, व्यवस्थापक यांना निधारित ईमेल आयडी evoting@nsdl.co.in वर संपर्क करा.

ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणी केले नाहीत किंवा संपर्क तपशील (पत्ता, बँकेचा तपशील, दूरध्वनी क्र. आदी) बदलण्यास / अद्ययावत करण्यास आणि इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सर्विस (ईसीएस) किंवा अन्य साधनांद्वारे थेट त्यांच्या खात्यामध्ये लाभांश प्राप्त करण्यास इच्छुक असतील त्यांनी खालील बाबींचे अनुसरण करावे.

भौतिक शेअरधारकांना कंपनीच्या निबंधक आणि शेअर हस्तांतरण एजंट मेसर्स बिगशेअर सर्विसेस प्रा. लि. यांना investor@bigshareonline.com येथे खालील नमूद दस्तावेज सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे किंवा कार्यालय क्र. एस६-२, ६वा मजला, पिनाकल बिजनेस पार्क, अहुरा सेंटरच्या पुढे, महाकाली केव्हज रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ येथे पाठवावेत.

| अ.क. | बदलाचा प्रकार | भौतिक होल्डींग | डीमॅट होल्डींग |
|---|---|---|---|
| १ | ईमेल पत्ता / दूरध्वनी क्र. बदल/नोंदणी | स्थायि खाते क्रमांक (पॅन) च्या स्व-साक्षांकित प्रतीसोबत विनंतीपत्र | डीमॅट धारकांनी कृपया त्यांच्या डीपॉजीटरी पार्टीसीपंटसना संपर्क करावा. |
| २ | पत्ता अद्ययावत करणे | विनंतीपत्र, जुन्या पत्याचा पुरावा, नवीन पत्याचा पुरावा (आधार कार्ड/विज देयक इत्यादी) | |
| ३ | बँक तपशीलचे अद्ययावतीकरण/ लाभांश थेट बँक खात्यामध्ये प्राप्त करण्यासाठी | कॅन्सल चेक (धारकाचे नाव असलेला) आणि पॅन कार्डच्या स्व-साक्षांकित प्रतीसोबत विनंतीपत्र | |

पुढे असेही कळविण्यात येते की समभागावरील लाभांश, प्रती शेअर ₹ ०.५०, एजीएममध्ये घोषित केल्यावर, कंपनीच्या सभासदांना, ज्यांचे नाव सोमवार, १९ सप्टेंबर, २०२२ रोजी सभासदांच्या रजिस्टरमध्ये / डीपॉजीटरीजच्या लाभार्थी धारकांच्या यादीमध्ये असेल त्यांना अदा करण्यात येईल. ज्या सभासदांनी त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक खात्याचा तपशील अद्ययावत केला नाही त्यांना त्यांचा तपशील बिगशेअर सर्विसेस प्रा. लि., कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजंट, जसे बिग शेअर सर्विसेस कार्यालय क्र. एस६-२, ६ वा मजला, पिनाकल बिजनेस पार्क, अहुरा सेंटरच्या पुढे, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३, भारत यांच्याकडे नोंदणी/अद्ययावत करा. दू. क्र. ०२२-६२६३८२०० फॅक्स: ०२२-६२६३८२९९ किंवा ईमेल investor@bigshareonline.com येथे पाठवू शकता.

एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद दस्तावेज निरीक्षणासाठी उपलब्ध आहेत. सभासद investor@trejhara.com येथे मेल पाठवून संदर्भ दस्तावेजाच्या निरीक्षणासाठी विनंती पाठवू शकतील.

ज्या सभासदांना वार्षिक अहवाल प्राप्त झाला नाही, ते कंपनीच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करू शकतील किंवा कंपनी सचिवाला investor@trejhara.com येथे लिहून त्यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रतीसाठी विनंती करू शकता.

**संचालक मंडळाच्या आदेशान्वये**
**ट्रेजहरा सोल्युशन्स लिमिटेड करता**
**हस्ता/-**
**स्थळ: नवी मुंबई** — **निलेश खर्चे**
**दिनांक: ०१ सप्टेंबर, २०२२** — **कंपनी सचिव**

Adfactors 260



aurionpro

## ओरियनप्रो सोल्यूशन्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** सिनर्जिया आयटी पार्क, प्लॉट क्र. आर-२७०, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल इस्टेट, न्यू रबाळे पोलीस स्टेशन जवळ, रबाळे, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र-४००७०१. **CIN:** L99999MH19997PLC111637 **दूरध्वनी क्र.** +९१-२२-४०४०-७०७०, **फॅक्स:** +९१-२२-४०४०-७०८०, **ईमेल:** investor@aurionpro.com, **संकेतस्थळ:** www.aurionpro.com

**वार्षिक सर्वसाधारण सभा, बुक क्लोजर आणि ई-व्होटींगची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, **ओरियनप्रो सोल्यूशन्स लिमिटेडची** २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम''), सदर सभेचे आमंत्रण देणाऱ्या सुचनेमध्ये नमुद कामकाज निष्पादनासाठी होईल. **सोमवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी स. १०:३० वा. (भाप्रवे), व्हीडीयो कॉन्फरन्सींग (''व्हीसी'') किंवा अन्य व्हीडीयो व्हीज्युअल साधनांद्वारे (''ओएव्हीएम'') होईल.**

कोव्हीड-१९ महामारीच्या उपद्रवामुळे, देशामधील विविध ठिकाणी व्यक्तिंच्या हालचालीवरील निर्बंध असल्याच्या दृष्टीकोनातून, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे (''एमसीए'') त्यांच्या ०८ एप्रिल, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. १४/२०२० सहवाचित ०५ मे, २०२२ दिनांकित परित्रक क्र. २/२०२२, ०८ डिसेंबर, २०२१ दिनांकित १९/२०२१, १४ डिसेंबर, २०२१ दिनांकित २१/२०२१, १३ जानेवारी, २०२१ दिनांकित ०२/२०२१, ०५ मे, २०२० दिनांकित २०/२०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. १७/२०२० (एकत्रीतरित्या ''एमसीए परिपत्रक'') आणि भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळाद्वारे (''सेबी'') द्वारे वितरीत अन्य प्रयोज्य अन्य परिपत्रकाच्या अनुरोधाने, कंपन्यांना या वर्ष दरम्यान सामाईक स्थळावर सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती विना व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएम आयोजनाची परवानगी दिली आहे., एमसीएस परिपत्रक, सेबी परिपत्रकांच्या अनुसार, कंपनीची एजीएम व्हीसी/ओएव्हीएमद्वारे आयोजीत करण्यात येईल.

उपरोक्त सदर एमसीए आणि सेबी परिपत्रकांच्या अनुरूपतेमध्ये, वित्तीय वर्ष २०२१-२२ करता कंपनीच्या वार्षिक अहवालासोबत एजीएमची सूचना, ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते त्यांच्या डीपॉजीटरी पार्टीसीपंटस/कंपनीकडे नोंदविले आहेत त्या सभासदांना गुरूवार, दिनांक ०१ सप्टेंबर, २०२२ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून (ई-मेल) पाठविण्यात आले आहेत.

वित्तीय वर्ष २०२१-२२ करता वार्षिक अहवालासोबत एजीएमची सूचना कंपनीच्या संकेतस्थळ www.aurionpro.com स्टॉक एक्सेंजेसची संकेतस्थळ अर्थात बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळांवर आणि एनएसडीएलचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.

कंपनीद्वारे देण्यात आलेल्या व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सभासद एजीएमला उपस्थित राहू शकतील. एजीएममध्ये उपस्थित राहण्याचे निर्देश एजीएम सूचनेमध्ये देण्यात आले आहेत.

कंपन्यांचा (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारित अधिनियम, २०१५ द्वारे सुधारित अनुसार, कंपन्यांचा (व्यवस्थापन आणि प्रशासन) अधिनियम, २०१४ च्या नियम २० सहवाचित, कंपन्यांचा कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ९१ आणि १०८ आणि सेबी (सुचिबध्दता बंधन आणि प्रकटन आवश्यकता विनियम) विनियम, २०१५, आणि त्या अतिरिक्त उपरोक्त नमूद परिपत्रकांच्या अनुरोधाने अशीही सूचना देण्यात येते की कंपनीच्या सभासदांचे रजिस्टर आणि कंपनीचे शेअर हस्तांतरण पुस्तक, एजीएम आणि लाभांश वाटपासाठी मंगळवार, २० सप्टेंबर, २०२२ ते मंगळवार, २७ सप्टेंबर, २०२२ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील.

कंपनी आपल्या सभासदांना एजीएममध्ये पारित होणाऱ्या प्रस्तावित ठरावांवर त्यांचा मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सुविधा पुरविणार आहे. सभासद त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे सभेच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त अन्य स्थळावरून (रिमोट ई-व्होटींग) किंवा एजीएम दरम्यान करू शकतील. ई-व्होटींग सेवा देण्यासाठी कंपनीने एनएसडीएल सोबत करार केला आहे. रिमोट ई-व्होटींग कालावधी शुक्रवार, २३ सप्टेंबर, २०२२ रोजी स. ९:०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, २५ सप्टेंबर, २०२२ रोजी सायं. ५:०० वा. (भाप्रवे) समाप्त होईल. रविवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी सायं. ५:०० वा. नंतर रिमोट ई-व्होटींग मॉड्यूल निष्क्रीय करण्यात येईल. सभासदांने रिमोट व्होटींग सुविधेद्वारे ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर, त्या सभासदाला ते बदलता येणार नाही. मतदानाचा अधिकार सोमवार, १९ सप्टेंबर, २०२२ (कट-ऑफ दिनांक) रोजी सभासदांनी धारण केलेल्या समभागांच्या संख्येनुसार असेल. केवळ कट-ऑफ तारखेला शेअर्स धारण केले असल्यास रिमोट ई-व्होटींगद्वारे किंवा एजीएमच्या दरम्यान मतदान करण्यासाठी सभासद पात्र आहेत. ज्या सभासदांनी वार्षिक अहवाल पाठविल्यानंतर शेअर्स संपादित केले आहेत आणि कट-ऑफ दिनांक अर्थात सोमवार, १९ सप्टेंबर, २०२२ रोजी शेअर्स धारण केले आहेत, ते एजीएम सूचनेमध्ये नमूद निर्देशांचे अनुसरण करून रिमोट ई-व्होटींग आणि एजीएममध्ये व्होटींग सुविधेसाठी पात्र होतील आणि लॉगइन आयडी व पासवर्ड प्राप्त होईल. ई-व्होटींगची सुविधा एजीएममध्येही उपलब्ध करण्यात येईल आणि ज्यांनी रिमोट ई-व्होटींगद्वारे मतदान केले नाही असे एजीएमला उपस्थित राहणारे एजीएम दरम्यान मतदानासाठी पात्र असतील. ज्या सभासदांनी त्यांचे मतदान रिमोट ई-व्होटींगद्वारे केले आहेत ते रिमोट ई-व्होटींगद्वारे मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतू त्यांना एजीएममध्ये पुन्हा मतदान करण्याची अनुमती नसेल.

डीमॅट आणि भौतिक प्रारूपामध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांद्वारे रिमोट ई-व्होटींग आणि एजीएममध्ये ई-व्होटींग आणि ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणी केले नाहीत त्यांच्यासाठी पध्दत आणि ई-व्होटींगसाठी लॉगइन आयडी आणि पासवर्ड संबंधीत माहिती, निर्देश आणि प्रक्रिया, एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

ई-व्होटींग विषयक काही विचारणा/तक्रारी असल्यास, तुम्ही एजीएमची सूचना किंवा https://www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शनमध्ये उपलब्ध असलेल्या सभासदांसाठी फिक्वेंटली आस्क क्वेश्चन (एफएक्यूज) पाहू शकता किंवा टोल मुक्त क्रमांक १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० वर संपर्क करा किंवा सुश्री पल्लवी म्हात्रे, व्यवस्थापक यांना निधारित ईमेल आयडी evoting@nsdl.co.in वर संपर्क करा.

ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणी केले नाहीत किंवा संपर्क तपशील (पत्ता, बँकेचा तपशील, दूरध्वनी क्र. आदी) बदलण्यास / अद्ययावत करण्यास आणि इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सर्विस (ईसीएस) किंवा अन्य साधनांद्वारे थेट त्यांच्या खात्यामध्ये लाभांश प्राप्त करण्यास इच्छुक असतील त्यांनी खालील बाबींचे अनुसरण करावे.

भौतिक शेअरधारकांना कंपनीच्या निबंधक आणि शेअर हस्तांतरण एजंट मेसर्स बिगशेअर सर्विसेस प्रा. लि. यांना investor@bigshareonline.com येथे खालील नमूद दस्तावेज सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे किंवा कार्यालय क्र. एस६-२, ६वा मजला, पिनाकल बिजनेस पार्क, अहुरा सेंटरच्या पुढे, महाकाली केव्हज रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ येथे पाठवावेत.

| अ.क. | बदलाचा प्रकार | भौतिक होल्डींग | डीमॅट होल्डींग |
|---|---|---|---|
| १ | ईमेल पत्ता / दूरध्वनी क्र. बदल/नोंदणी | स्थायि खाते क्रमांक (पॅन) च्या स्व-साक्षांकित प्रतीसोबत विनंतीपत्र | डीमॅट धारकांनी कृपया त्यांच्या डीपॉजीटरी पार्टीसीपंटसना संपर्क करावा. |
| २ | पत्ता अद्ययावत करणे | विनंतीपत्र, जुन्या पत्याचा पुरावा, नवीन पत्याचा पुरावा (आधार कार्ड/विज देयक इत्यादी) | |
| ३ | बँक तपशीलचे अद्ययावतीकरण/ लाभांश थेट बँक खात्यामध्ये प्राप्त करण्यासाठी | कॅन्सल चेक (धारकाचे नाव असलेला) आणि पॅन कार्डच्या स्व-साक्षांकित प्रतीसोबत विनंतीपत्र | |

पुढे असेही कळविण्यात येते की समभागावरील लाभांश, प्रती शेअर ₹ २.५, एजीएममध्ये घोषित केल्यावर, कंपनीच्या सभासदांना, ज्यांचे नाव सोमवार, १९ सप्टेंबर, २०२२ रोजी सभासदांच्या रजिस्टरमध्ये/डीपॉजीटरीजच्या लाभार्थी धारकांच्या यादीमध्ये असेल त्यांना अदा करण्यात येईल. ज्या सभासदांनी त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक खात्याचा तपशील अद्ययावत केला नाही त्यांना त्यांचा तपशील बिगशेअर सर्विसेस प्रा. लि., कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजंट, जसे बिग शेअर सर्विसेस कार्यालय क्र. एस६-२, ६ वा मजला, पिनाकल बिजनेस पार्क, अहुरा सेंटरच्या पुढे, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३, भारत यांच्याकडे नोंदणी / अद्ययावत करा. दू. क्र. ०२२-६२६३८२०० फॅक्स : ०२२-६२६३८२९९ किंवा ईमेल investor@bigshareonline.com येथे पाठवू शकता.

एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद दस्तावेज निरीक्षणासाठी उपलब्ध आहेत.सभासद investor@aurionpro.com येथे मेल पाठवून संदर्भ दस्तावेजाच्या निरीक्षणासाठी विनंती पाठवू शकतील.

ज्या सभासदांना वार्षिक अहवाल प्राप्त झाला नाही, ते कंपनीच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करू शकतील किंवा कंपनी सचिवाला investor@aurionpro.com येथे लिहून त्यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रतीसाठी विनंती करू शकता.

**संचालक मंडळाच्या आदेशान्वये**
**ओरियनप्रो सोल्यूशन्स लिमिटेड करता**
**हस्ता/-**
**स्थळ: नवी मुंबई** — **निनाद केळकर**
**दिनांक: ०१ सप्टेंबर, २०२२** — **कंपनी सचिव**

Adfactors 259



## एस्सार पॉवर (झारखंड) लिमिटेड – परिसमापनामध्ये

**यू31101डीएल2005पीएलसी211274**

**ई - लिलाव विक्री सूचना**

**मालमत्तेची विक्री**

एस्सार पॉवर (झारखंड) लिमिटेडच्या कोलकाता येथील 5 कंटेनर फ्रेट स्टेशन्स (सीएफएस) येथील (एकत्रिरित्या आणि वेगवेगळेपणाने) अर्थात सेंचुरी जेजेपी, बालमेर लॉरी, सेंट्रल वेअरहाऊसींग कॉर्पोरेशन, कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड आणि सेंचुरी सोनाई स्येथे स्थित प्लांट आणि मशिनरी आणि अन्य जंगम मलामत्ता.

ई-लिलाव 16 सप्टेंबर, 2022 रोजी दु. 3.00 ते दु. 4.00 पर्यंत **www.eauctions.co.in** च्या वेब पोर्टलवर होईल.

अधिक माहितीसाठी +91 88285 76197 येथे संपर्क करा किंवा epjl.lq@gmail.com येथे ईमेल करा. विस्तृत विक्री सूचना संकेतस्थळ **www.eauctions.co.in** वर अपलोड करण्यात आली आहे.

**एस्सार पॉवर (झारखंड) लिमिटेड - परिसमापनामध्ये करिता**
**हुजेफा फक्रि सिताबखान, परिसमापक**
IBBI/IPA-001/IP-P00031/2017-18/10115
huzefa.sitabkhan@gmail.com, epjl.lq@gmail.com

दिनांक : 02 सप्टेंबर, 2022
स्थळ : मुंबई



## पश्चिम रेल्वे

### ट्रान्समिशन आणि कनवेअर बेल्टची खरेदी

ई-प्रापण निविदा सूचना क्र. ट्रॅक मशीन्स दिनांकित ०१.०९.२०२२ मुख्य अभियंता, पश्चिम रेल्वे, चर्चगेट खालील ई-प्रापण निविदा मागवित आहेत.

| क्र. | निविदा क्र. | भांडार निविदेचे वर्णन | एकूण परि. नं. मध्ये/प्रकार | एकूण निविदा मूल्य रु. मध्ये | इसारा रक्कम ठेव रु. मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| १. | डब्ल्यू६४१-२२-२२-०२ | युटीव्ही आणि आर एमबीव्ही मशीन्सकरिता ट्रान्समिशन (ट्रान्समिशन) गियर बॉक्सची खरेदी मेक:- आणि फूलटास / एव्हटेक. | ०२ नं./ १ टाईप | रु. ३९,८९,८८६.८० | रु. ७९,८००/- |
| २. | डब्ल्यू६४१-२२-२२-०६ | ट्रॅक मशीनकरिता विविध प्रकारच्या कनवेअर बेल्टची खरेदी. मेक:- प्लाझेर / डनलप/ निरलॉन /एमआरएफ/ एमआर/ वषभ/ बिसवास/ जागती | १०८ नं./ २१ टाईप | रु. ४५,८०,२३७.५० | रु. ९१,६१०/- |

**ई-निविदा समाप्तीचा दिनांक ११.०० वाजता.: ३०.०९.२०२२ प्रत्येकीसाठी.**
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक ११.१५ वाजता.: ३०.०९.२०२२ प्रत्येकीसाठी.**

टीप : (१) वरील ई-प्रापण निविदेची निविदा कागदपत्रे पूर्ण माहितीसह https://ireps.gov.in वर निविदा उघडण्याच्या देय दिनांकापर्यंत उपलब्ध असतील.

**(२) सदर निविदेसाठी ई-बोली स्वरूपात अन्य स्वरूपात बोली स्वीकारल्या जाणार नाहीत. सदर कारणासाठी विक्रेत्यांनी आयटी कायदा-** २००० अंतर्गत सीसीएद्वारे जारी करण्यात आलेल्या वर्ग-III डिजिटल सिग्नेचर प्रमाणपत्रासह आयआरईपीएस संकेतस्थळावर नोंदणी करावी. **0394**

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly



## फॉर्म क्र. आयएनसी - २५ए

**पब्लिक कंपनीचे प्रायव्हेट कंपनीमध्ये परीवर्तन करण्यासाठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे**

प्रादेशिक संचालक, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय,
पश्चिम क्षेत्र यांच्या समक्ष

कंपनी कायदा, २०१३, कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १४ आणि कंपनी (इनकॉर्पोरेशन) अधिनियम, २०१४ च्या नियम ४१ च्या प्रकरणामध्ये

**आणि**

**मेसर्स केमस्पेक केमिकल्स लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय प्लॉट क्र. ३-सी, एमआयडीसी तळोजा, ता. - पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१०२०८ येथे आहे त्यांच्या प्रकरणामध्ये ... **अर्जदार**

याद्वारे सर्व जनतेला **सूचना** देण्यात येते की, सदर कंपनी केंद्र सरकारकडे उपरोक्त नमूद अधिनियमासह वाचित कंपनी कायद्याच्या, २०१३ च्या अनुच्छेद १४ अंतर्गत अर्ज करण्यास इच्छुक आहे आणि अशा परीवर्तनाला परिणामस्वरूप देणे शक्य होण्यासाठी ३० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये पारित विशेष ठरावांच्या परिभाषेमध्ये प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये परिवर्तीत करण्यास इच्छुक आहेत.

कोणत्याही व्यक्तीच्या हिताला कंपनीच्या प्रस्तावित बदल/स्थितीमुळे बाधा पोहोचण्याची संभावना असल्यास, सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून चौदा दिवसात, खालील नमूद पत्यावरील नोंदणीकृत कार्यालय येथील अर्जदाराच्या प्रतीसोबत संबंधीत प्रादेशिक संचालक यांना (एव्हरेस्ट, ५ वा मजला, १००, मरीन ड्राईव्ह, मुंबई - ४००००२) येथे हिताचे स्वरूप आणि विरोधाचे कारण नमूद ॲफिडेव्हीटच्या आधारे त्यांच्या हरकती पाठवाव्यात किंवा पाठविण्यास कारण व्हावे किंवा रजिस्टर पोस्टाद्वारे पाठवावेत.

अर्जदार **मेसर्स केमस्पेक केमिकल्स लिमिटेड**
करिता आणि वतीने
**हस्ता/-**
**ऋषभ व्होरा**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन : ००३८२१९८**
प्लॉट क्र. ३-सी, एमआयडीसी तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१०२०८

दिनांक : ०२.०९.२०२२
स्थळ : नवी मुंबई